# वसई विरार शहर महानगरपालिका

वैद्यकीय आरोग्य विभाग
महानगरपालिका मुख्य कार्यालय, 'ए' विंग,
सातवा मजला, यशवंत नगर, विरार (प.) ता. वसई, जि. पालघर – ४०१ ३०३
Email Id-mohvvcmc@gmail.com

**जावक क्र.वविशम/वैआवि /२९९७/२०२६** **दि.२३/०१/२०२६**

## // जाहीर सूचना //

**राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) व १५ वा वित्त आयोग व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP)अंतर्गत ठोक मानधनावरील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिका राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) व १५ वा वित्त आयोग व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP) अंतर्गत करार तत्वावर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी रिक्त पदे भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी **वैद्यकीय अधिकारी -बालरोग तज्ञ, साथरोग तज्ञ, शहर गुणवत्ता कार्यक्रम समन्वयक, एम.बी.बी.एस.(पूर्णवेळ/अर्धवेळ) या संवर्गातील उमेदवाराच्या थेट मुलाखती (Walk in Interview) दि.०२/०२/२०२६ ते दि.०६/०२/२०२६ रोजीपर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, सामान्य परीषद कक्ष, "ए" विंग, सातवा मजला, यशवंत नगर, विरार (प.) येथे सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत घेण्यात येणार आहेत.**

**तसेच वैद्यकीय अधिकारी-बी.ए.एम.एस., स्टाफ नर्स (GNM) स्त्री, औषधनिर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, कार्यक्रम सहाय्यक व बहुउद्देशीय आरोग्य सेवक (पुरुष) या संवर्गातील पदांच्या थेट मुलाखत न घेता गुणांकन (Merit) पध्दतीने पदभरतीची प्रक्रिया करण्यात येईल. तरी संबंधित पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या गुणपत्रके व प्रमाणपत्राच्या मूळप्रती व स्वक्षांकित सत्यप्रतींसह दि.०२/०२/२०२६ ते दि.०६/०२/२०२६ रोजीपर्यंत सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, तळ मजला, यशवंत नगर, विरार (प.) येथे प्रत्यक्षात (By Hand) किंवा टपालाने/कुरीयरने सादर करण्यात यावेत.** दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (टपालाने/कुरीयरने सादर करण्यात आलेले अर्ज विहीत कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा व अपुर्ण प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.)

**तक्ता - "अ"**

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रवर्ग व पद संख्या | एकूण पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बालरोग तज्ञ Paediatrician | अ.जा.- १ | १ | MD Paed/ DCH/DNB MMC Reg. | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्षे | रु.७५,०००/- |
| २ | साथरोग तज्ञ Epidemiologist | खुला - १ | १ | Any Medical Graduate (MBBS/BDS/ AYUSH etc.) With MPH/MHA/ MBA in Health. | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्षे | रु.३५,०००/- |
| ३ | शहर गुणवत्ता कार्यक्रम समन्वयक | खुला - १ | १ | Any Medical Graduate (MBBS/BDS/ AYUSH etc.) With MPH/MHA/ MBA in Health. | खुला ३८ वर्षे राखीव ४३ वर्षे | रु.३५,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. (NUHM) | अ.ज.- ४<br>वि.जा.(अ)- १<br>भ.ज.(क)- १<br>भ.ज.(ड)- १<br>ईडब्ल्यूएस- १<br>खुला - २ | १० | MBBS with MCI Registration/ MMC Registration | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रु.७५,०००/-<br>(शासन रु.६०,०००/- + मनपा रु.१५,०००/-) |
| ५ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. (NUHM) | बिदुनामावली लागु नाही. | १९ | MBBS with MCI Registration/ MMC Registration | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रु.३०,०००/- |
| ६ | वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. १५ वा वित्त आयोग | अ.जा.- ४<br>अ.ज.- १४<br>वि.जा.(अ)- २<br>भ.ज.(ब)- २<br>भ.ज.(क)- २<br>विमाप्र- १<br>इ.मा.व.- ८<br>एसईबीसी- ७<br>ईडब्ल्यूएस- ६<br>खुला - ६ | ५२ | MBBS with MCI Registration/ MMC Registration | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | रु.६०,०००/- |
| | एम.बी.बी.एस. उमेदवार न मिळाल्यास बी.ए.एम.एस. तात्पुरती नियुक्ती | | | BAMS with MCIM Registration | खुला ३८ वर्षे, राखीव ४३ वर्षे | रु.२५,०००/- अधिक रु.१५,०००/- (कामावर आधारीत मोबदला) रु.४०,०००/- |

**तक्ता - "ब"**

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रवर्ग व पद संख्या | एकूण पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | मासिक एकत्रित मानधन (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स (GNM) स्त्री (NUHM) | अ.जा.- १<br>अ.ज.- १<br>वि.जा.(अ)- १<br>ईडब्ल्यूएस - ३ | ६ | GNM/Bsc Nursing महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | खुला ३८ वर्षे, राखीव ४३ वर्षे | रु.३४,८००/-<br>(शासन रु.२०,०००/ मनपा रु.१४,८००/- |
| २ | स्टाफ नर्स (GNM) स्त्री १५ वा वित्त आयोग | वि.जा.(अ)- १<br>भ.ज.(क)- १<br>एसईबीसी- ५<br>ईडब्ल्यूएस- ५ | १२ | GNM/Bsc Nursing महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | खुला ३८ वर्षे, राखीव ४३ वर्षे | रु.२०,०००/- |
| ३ | औषधनिर्माता (NUHM) | ईडब्ल्यूएस- १ | १ | D.Pharma/B.Pharma with MPC Registration | खुला ३८ वर्षे, राखीव ४३ वर्षे | रु.२०,८००/- |
| ४ | औषधनिर्माता राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP) | खुला- १ | १ | D.Pharma/B.Pharma with MPC Registration | खुला ३८ वर्षे, राखीव ४३ वर्षे | रु.१७,०००/- |
| ५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ(NUHM) | भ.ज.(ब)- १<br>ईडब्ल्यूएस- १<br>खुला - १ | ३ | B.sc with D.M.L.T. | खुला ३८ वर्षे, राखीव ४३ वर्षे | रु.१८,७००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | कार्यक्रम सहाय्यक | खुला - १ | १ | १) विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी परिक्षा उत्तीर्ण.<br>२) शासनमान्य संस्थेची मराठी आणि इंग्रजी टंकलेखनाची ३० श.प्र.मि. परिक्षा उत्तीर्ण. | खुला ३८ वर्षे, राखीव ४३ वर्षे | रु.१८,०००/- |
| ७ | बहुउद्देशीय आरोग्य सेवक (पुरुष)<br>१५ वा वित्त आयोग | अ.जा.- ५<br>अ.ज.- ४<br>वि.जा.(अ)- १<br>भ.ज.(ब)- २<br>भ.ज.(ड)- १<br>विमाप्र- १<br>एसईबीसी- ७<br>ईडब्ल्यूएस -५<br>इ.मा.व.- ४<br>खुला - ७ | ३७ | १) १२ वी सायन्स शाखेचा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) Paramedical Basis Training Course OR Sanitary Inspector Course उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) बहुउद्देशीय आरोग्य सेवक (एम.पी.डब्ल्यु.) या कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | खुला ३८ वर्षे, राखीव ४३ वर्षे | रु.१८,०००/- |

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेकरिता रिक्त पदांच्या कंत्राटी पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार मंजुर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात वसई विरार शहर महानगरपालिकेच्या **http://www.vvcmc.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**१) वयोमर्यादा –**

१. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय जाहिरातीतील विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई दि.२५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार पदांसाठी अतिविशेषतज्ञ, विशेषतज्ञ व पूर्णवेळ/अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी-एम.बी.बी.एस. यांचे वयोमर्यादा ७० वर्ष व वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**२) अर्ज भरण्याबाबतच्या सूचना –**

१. उमेदवाराने स्वतचे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणेच अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

२. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद जन्म तारीखच अर्जात नमूद करावी.

३. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष) अचूक नमूद करावे.

४. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:च्या वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक अचुक नमूद करणे बंधनकारक आहे. पात्र उमेदवारांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६. उमेदवाराने आपला जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा.

७. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरुपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.

**३) अर्ज करण्याच्या अनुषंगाने सूचना —**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२) अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

३) अर्ज भरत असताना अंतिम वर्षात मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे.

४) उमेदवारांनी फॉर्ममध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

५) पात्र उमेदवारांनी नियुक्तीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

६) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था/ विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

७) आर्थिकदृष्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६/अ, दि.१२/०२/२०१९ व दि.३१/०५/२०१९ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

८) आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने जात प्रमाणपत्र तसेच चालू वर्षातील वैधता असलेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**४) अनुभव —**

१) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हताधारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२) अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे. अशाच शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थेचा तपशील फॉर्ममध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

३) अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशील नमूद करताना दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

४) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**५) कुटुंबाचे प्रमाणपत्र —**

१) लहान कुटुंबाची अट दि.२८/०३/२००५ पासून लागू करण्यात आली असून दि.२८/०३/२००५ पासून दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत.

२) विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने रुजु होण्या अगोदर सादर करणे अनिवार्य आहे.

**६) निवड प्रक्रिया —**

१) सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या उमेदवारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार/गुणांकन पध्दतीने निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

२) उमेदवाराची निवड करावयाची असल्यास शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गठित करण्यात आलेल्या समिती यांच्या मान्यतेने मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:३ व १:५ उमेदवारांची निवड गुणांकन पध्दतीने करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी/ पदविका परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण अतिरिक्त अर्हता विचारात घेऊन खालीलप्रमाणे करण्यात येईल.

**१) थेट मुलाखती —** अतिविशेषतज्ञ, विशेषतज्ञ, वैद्यकीय अधिकारी -एम.बी.बी.एस. ही पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

१) Subject Knowledge (१०)

२) Research & Academic Knowledge (१०)

३) Leadership Quality (१०)

४) Administrative Abilities (१०)

५) Experience (१०)

a) For Govt. Experience- २ marks for one year

b) For Private Experience- १ marks for one year

६) Total Experience - १० marks Maximum.

**एकूण गुण- ५०**

**२) गुणांकन पध्दती —** उपरोक्त थेट मुलाखतीमधील पदांव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरिता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवावी.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proporation काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे proportion= ६०X५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१ Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.sc(Nursing) ही शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.sc(Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proportion=६०X२०/१००=१२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकूण १०० गुण |

१. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र मुंबई यांचे पत्र क्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती/१०६७०-११०१६/२०२३ दि.२७/०४/२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचनांनुसार गुणांकन पध्दतीने पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

२. गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येणार असून त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश E-mail/दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल.

३. गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवारांचे गुणांकन(Merit) व वय देखील समान असेल तर अशावेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

४. गुणांकन पध्दतीनुसार भरण्यात येणाऱ्या पदांकरिता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नाही.

**७) सर्वसाधारण सूचना —**

१) सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी http://www.vvcmc.in या संकेतस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

२) बहुउद्देशीय आरोग्य सेवक (पुरुष) या पदासाठी मा. सहसंचालक आरोग्य सेवा (हि.ह.व.ज.रोग) पुणे यांचे पत्र जा.क्र.ससंआसे/पदभरती/आरोग्य निरीक्षक/ प्रमाणपत्र/९६१३-१४/कक्ष-५२ अ/ न.क्र./२०२४ दि.०७/०३/२०२४ यास अधिन राहुन नेमणुका देण्यात येईल.

३) उपरोक्त नमूद केलेली पदे ही कंत्राटी तत्वावर कराराद्वारे ११ महिने कालावधीसाठी भरणेत येत आहे. सन २०२६-२७ च्या कृती आराखडयामध्ये सदर पदांची मंजुरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा आपोआप संपुष्टात येईल.

४) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदांवर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत. उमेदवार राज्यशासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करुन शकणार नाही. उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल. अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

५) जाहिरातीत नमूद केलेले पदाचे मानधन हे एकत्रित ठोक मानधन आहे.

६) जाहिरातीतील पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो.

७) जाहिरातीमधील सदर रिक्त पदांच्या संख्येत, शैक्षणिक अर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजिक आरक्षण, नियुक्ती ठिकाणामध्ये बदल, नमुद केलेल्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे तसेच संपुर्ण निवडप्रक्रिया रद्द करणे/बदल करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत/रिक्त पदांच्या संख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.

८) उमेदवारांकडून अर्धवट, अपुर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केले गेला असल्याने, संबंधित उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास, अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वी व संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्विकारली जाणार नाही. अर्ज भरणेकामी काही अडचणी असल्यास कार्यालयास समक्ष भेट देऊन विचारणा करण्यात यावी.

९) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत मुळ कागदपत्रासह नियुक्तीचे ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. उमेदवाराने अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये व मुळ कागदपत्रांमध्ये पडताळणीच्या वेळीस तफावत आढळल्यास तसेच उमेदवाराने कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करणेत येईल, अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून,प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

१०) १५ वा वित्त आयोग अंतर्गत मंजुर आयुष्मान आरोग्य मंदिर (आरोग्यवर्धिनी केंद्रे) यांची टप्प्याटप्प्याने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये स्थापना करण्यात येते असुन आवश्यकतेप्रमाणे याकरीता निवड झालेले वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी यांना आदेश निर्गमित करण्यात येतील याची नोंदी घ्यावी.

११) उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचा जाहिरातीमधील अनु.क्रमांक स्पष्टपणे अर्जामध्ये नमूद करणे आवश्यकआहे. इतर पदासाठी उमेदवाराने स्वतंत्ररित्या अर्ज सादर करावेत.

१२) भरतीप्रक्रियेबाबतची उमेदवारांनी जमा केलेली कागदपत्रे एक वर्षापर्यंत उपलब्ध राहतील. त्यानंतर सदरची कागदपत्रे उपलब्ध होणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**(सही)/-**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

(स्वाती देशपांडे)
उप- आयुक्त तथा सदस्य
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान
वसई विरार शहर महानगरपालिका